# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीतील ०७ गुन्हेगार इसमांना पुणे शहर व जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- २१/०५/२०१८

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीतील इसम नामे (१) गणेश लक्ष्मण लगस, रा. ६७ राज सदन बिल्डींग, फ्लॅट नं. ४, संतोषनगर, कात्रज पुणे व स.नं. ४७/१६ तावरे कॉलनी, पुणे (टोळी प्रमुख) (२) गजानन शिवानंद स्वामी, रा. नविन वसाहत, पाण्याचे टाकीजवळ, संतोषनगर, कात्रज पुणे (टोळी सदस्य) (३) ऋषीकेश सिध्दार्थ नंदुरे, रा. हनुमान कॉम्प्लेक्स फ्लॅट नं. १ संतोषनगर, कात्रज पुणे (टोळी सदस्य) (४) किरण संदीप वाडकर, रा. जुन्या पाण्याच्या टाकीजवळ, संतोषनगर, कात्रज पुणे (टोळी सदस्य) (५) किरण प्रल्हाद मोरे, रा. नागराज मंदीराशेजारी संतोषनगर, कात्रज पुणे (टोळी सदस्य) (६) निखील दिनेश चव्हाण, रा. स.नं. ६७ नागराज मंदीरामागे संतोषनगर, कात्रज पुणे (टोळी सदस्य) (७) विजय लक्ष्मण लगस, रा. स.नं. ४७/१६ तावरे कॉलनी, पुणे संतोषनगर, कात्रज पुणे (टोळी सदस्य) यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश ०५/२०१८ दिनांक २१/०५/२०१८ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्र व पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसमांविरुध्द ते एकत्रित व वैयक्तिक गुन्हे करत होते. त्यांचे विरुध्द खून करण्याचा प्रयत्न करणे, जखमी करणे, हाताने मारहाण करुन धमकी देणे, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने दुखापत करणे, सामाईक इरादा, दरोडा तयारी, दरोडा घालण्यासाठी एकत्र जमणे, प्रतिबंधक आदेशाचा भंग करणे, चोरी करणे, गंभीर दुखापत करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे भारती विद्यापीठ, दत्तवाडी, स्वारगेट आणि सहकारनगर पोलीस ठाणे येथे दाखल असून टोळी प्रमुख गणेश लक्ष्मण लगस, रा. ६७ राज सदन बिल्डींग, फ्लॅट नं. ४, संतोषनगर, कात्रज पुणे व स.नं. ४७/१६ तावरे कॉलनी, पुणे व इतर टोळी सदस्य यांची सदर भागात दहशत असल्याने त्यांना डॉ. प्रविण मुंढे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातून व पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.